| MHNG030044492026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७७७/२०२६**<br>**सुमन गिरधारी सामल वि. महाराष्ट्र शासन** |
|---|---|

## निशाणी १ वरील आदेश

अर्जदार सुमन गिरधारी सामल यांनी कळमना पोलिस स्टेशन, नागपूर येथे गु.र.क्र.७७८/२०२५ मध्ये कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) व ३१७(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त करण्यात आलेल्या खालील प्रमाणे नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्याकरीता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ५०३ नुसार अर्ज दाखल केला आहे.

१. सोन्याची चैन ९.४० ग्राम
२. सोन्याच्या २ बांगड्या २२ ग्राम
३. सोन्याचे हुक इअररिंग ३.१६ ग्राम
४. सोन्याचे डोरले व दोन मनी १.१८ ग्राम
५. चांदीची पायपट्टी ४ जोड २२५.८५ ग्राम
६. चांदीचे २ कडे १००.९३ ग्राम
७. चांदीचे कमरहुक ३ नग ३८.०५ ग्राम
८. चांदीचे सिक्के ३ नग १९.४२ ग्राम
९. चांदीचे पायपट्टी जोडवे ३ नग ३८.०५ ग्राम
१०. चांदीचे पदक १ नग ३.५६ ग्राम
११. चांदीचे तावीज लॉकेट १ नग १.५३ ग्राम
१२. चांदीचे रिंग १८ नग ३६.४६ ग्राम
१३. चांदीची अंगठी ४ नग २२.९६ ग्राम

**२.** अर्जदाराच्या कथनानुसार वर नमुद गुन्ह्याच्या तपासाकामी पोलीसांनी वर नमुद केल्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. अर्जात नमूद मुद्देमाल/वस्तु हा तिच्या मालकीचा आहे. अर्जदाराला वर नमुद वस्तु या तिच्या लग्नात स्त्री धन म्हणून प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे त्याचे बिल तिच्याकडे उपलब्ध नाही. सदर मुद्देमाल जास्त दिवस पोलिस स्टेशनला पडुन राहील्यास तो खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदार यांनी अर्जात नमूद मुद्देमाल परत मिळाल्यास न्यायालयाने नमूद केलेल्या अटी शर्तींचे अर्जदार पालन करण्यास तयार आहे असे नमूद केले असून अर्ज मंजूर

करण्याची विनंती केली आहे.

**३.** संबंधित तपासी अधिकारी यांनी निशाणी ४ प्रमाणे खुलासा दाखल केला आहे की, अर्जदाराने जप्त केलेला मुद्देमाल ओळखलेला आहे व त्याचा ओळख पंचनामा देखील केलेला आहे. त्यामुळे त्यांनी योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे. विद्वान सरकारी वकील यांनी योग्य ते आदेश करण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांनी त्यांचे कथनाच्या पुष्टीकरीता निशाणी ३ सोबत आधार कार्ड व एफआयआर ची प्रत दाखल केली आहे. प्रकरणात दाखल एफआयआर वरुन असे दिसून येते की, अर्जदार हिने घटनेच्या वेळी तिच्या घरातून दागीने चोरी झाल्याची फिर्याद दाखल केली आहे. तसेच तपास अधिकारी यांनी निशाणी ६ सोबत फिर्यादीच्या जबाबाची प जप्ती पंचनाम्याची प्रत दाखल केलेली आहे. सदर प्रकरणाच्या चौकशी करीता आरोपींना नोटिस पाठविली असता त्यांनी प्रकरणात कोणताही खुलासा दाखल केलेला नाही. तसेच आज पर्यंत अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही अर्जात नमुद मुद्देमालाच्या अंतरिम ताब्याची मागणी केलेली नाही. वर नमुद सर्व बाबीवरुन अर्जदार हे अर्जात नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास अर्जदार पात्र आहे असे प्रथम दर्शनी दिसुन येते.

**५.** अर्जात नमूद जप्त मुद्देमाल/वस्तु पोलिस स्टेशनला जास्त दिवस पडुन राहील्यास ते निश्चित खराब होण्याची शक्यता आहे व तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल हे देखील स्पष्ट आहे. ***सुदरभाई अंबालाल देसाई वि. गुजराथ राज्य ए.आय.आर. २००३ मा.सर्वोच्च न्यायालय ६३८*** या न्यायनिर्णयातील मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार अशा जप्त मुद्देमालासंबंधी त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर मुद्देमाल योग्य त्या अटी-शर्तीवर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. संबंधित तपासी अधिकारी यांनी अर्जास हरकत उपस्थित केलेली नाही. अर्जात दाखल दस्तऐवजांवरुन व खुलाशाचे अवलोकन करता अर्जदार हे अर्जात नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र ठरतात. सबब खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे-

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद गु.र.क्र.७७८/२०२५ मध्ये कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) व ३१७(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे नोंद असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान जप्त करण्यात आलेले खालील नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा रक्कम रुपये ७,५०,०००/- (रुपये सात लाख पन्नास हजार मात्र) चे सुपूर्तनामा सादर केल्यानंतर त्या खालील नमुद अटी व शर्तीवर अर्जदार **सुमन गिरधारी सामल** यांना देण्यात यावा.

१. सोन्याची चैन ९.४० ग्राम
२. सोन्याच्या २ बांगड्या २२ ग्राम
३. सोन्याचे हुक इअररिंग ३.१६ ग्राम
४. सोन्याचे डोरले व दोन मनी १.१८ ग्राम
५. चांदीची पायपट्टी ४ जोड २२५.८५ ग्राम
६. चांदीचे २ कडे १००.९३ ग्राम
७. चांदीचे कमरहुक ३ नग ३८.०५ ग्राम
८. चांदीचे सिक्के ३ नग १९.४२ ग्राम
९. चांदीचे पायपट्टी जोडवे ३ नग ३८.०५ ग्राम
१०. चांदीचे पदक १ नग ३.५६ ग्राम
११. चांदीचे तावीज लॉकेट १ नग १.५३ ग्राम
१२. चांदीचे रिंग १८ नग ३६.४६ ग्राम
१३. चांदीची अंगठी ४ नग २२.९६ ग्राम

अ. अर्जात नमूद वस्तू आहे त्या स्थितीत ठेवण्यात यावे. त्याचे रंगात, आकारात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येवु नये व इतर कोणालाही हंस्तातरण किंवा विक्री करण्यात येवु नये.

ब. न्यायालय आदेश करले त्यावेळी सदर वस्तु आदेशित स्थळी हजर करावे.

क. अर्जदार यांनी वस्तूसबंधी मुळ दस्त ताबा घेतेवेळेस तपासी अधिकारी यांचे अवलोकनाकरीता हजर करावे. तपासी अधिकारी यांनी मूळ दस्तऐवजांचे अवलोकन केल्यानंतरच वर नमुद मुददेमालाचा अंतरीम ताबा अर्जदारास दयावा.

ड. **अर्जात नमुद मुद्देमालाच्या धातुच्या शुध्दतेबाबत अधिकृत व्यक्तीमार्फत शुध्दता तपासल्यानंतरच त्यांचा अंतरीम ताबा अर्जदारास दयावा.**

३. अर्जदार यांना जप्त मुद्देमालाचा/वस्तू चा ताबा देण्यापुर्वी संबंधित तपासी अधिकारी यांनी अर्जदाराच्या खर्चाने जप्त मुद्देमालाचा साक्षीदारांसमक्ष नियमानुसार पंचनामा तयार करुन, त्याचे रंगीत छायाचित्रे काढुन दोषारोप पत्रासह न्यायालयात दाखल करावे.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.04.22 17:23:25 +0530

दिनांकः २२/०४/२०२६

**(निलेश भा. पाटील)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.३, नागपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of Order are word to word as per original Order.

Name of Stenographer : Smt. V.N. Meshram